Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# वसंतराव नाईक कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय येथे रक्तदान शिबीर यशस्वी संपन्न

वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे "एकनिल रक्तपेढी, यवतमाळ" व राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.

सामाजिक कार्याची आवड निर्माण होण्याचे दृष्टीने व विद्यार्थ्यामध्ये रक्तदानाचे महत्व पटविण्याचे दृष्टीकोनातुन हा उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. एन. डी. पार्लावार यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्व पटवून देतांना म्हणाले की, आपल्या स्वकीयांना जेव्हा रक्ताची गरज भासते, त्यावेळी आपल्याला रक्ताचे महत्व कळते. आपण समाजाचे काही देणं लागतो. समाजाचे आपल्यावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष ऋण असते. त्यामुळे असे ऋण फेडण्याची संधी आपल्याला अशा शिबीराने मिळते. रक्तदान केल्याने राष्ट्रीय सद्भावना वाढीस लागते. युवकांनी दरवर्षी कमीत कमी १ वेळा स्वच्छेने रक्तदान करून राष्ट्रीय कार्यात आपला सहभाग नोंदवावा.

डॉ. ज्ञानेश्वर तंबाखे यांनी आपल्या संबोधनात सांगितले की, रक्ताची निर्मीती कोणत्याही कारखान्यात करता येत नाही. अश्या वेळी अद्यापही आपल्या देशात रक्ताचा तुटवडा भासतो. त्याबाबत खेद व्यक्त केला व युवकांनी हया बहूमुल्य उपक्रमात मोठया प्रमाणात सहभाग नोंदवून रक्तदान करावे असे सांगितले.

या प्रसंगी विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच प्राध्यापक कर्मचारी वृंद यांचा मोठया प्रमाणात रक्तदान शिबीरात सहभाग नोंदविला.

"एकनिल रक्तपेढी, यवतमाळ" तर्फे डॉ. गजानन निरवाडे, व डॉ. ज्ञानेश्वर तंबाखे हयांनी व संपूर्ण चमुने वसंतराव नाईक कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय यवतमाळ, येथे येवून सहकार्य केल्याबाबत त्याचे आभार व्यक्त करण्यात आले.

या प्रसंगी तुषार निचत या अपंग विद्यार्थ्याने रक्तदान केले. विश्वास राठोड याने आपले मनोगत व्यक्त केले. कु. सोनाली शिरस्कर हिने सुत्रसंचालन व आभार व्यक्त केले. तर डॉ. प्रशांत शिंगोटे रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी, यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. रक्तदान शिबीराच्या यशस्वीतेसाठी प्रा. अंजली गहरवार, प्रा. धिरज वसुले, डॉ. रविंद्र सातभाई, डॉ. संदेश बांगर, प्रा. हेमंत वाघ, डॉ. रोशन शिंदे, रूपेश राऊत, एकनाथ भंकाळे, प्रविण डोंगरे, शुभम धार्मिक, निळकंठ मानकर कर्मचारी, यांनी परिश्रम घेतले.